हे माहीत आहे?}

# महिलांच्या मृत्यूचे पाचवे सर्वात मोठे कारण



**शीर्षक** वाचून विचारात पडला असाल की असा कोणता आजार आहे की जो जगभरातल्या महिलांच्या मृत्यूचे मोठे कारण आहे. तर ते कारण आहे की मासिक पाळी. मासिक पाळीविषयी पुरेशी माहिती नसणं, त्या काळात सुरक्षित पद्धतीने स्वतःच्या आरोग्याची काळजी कशी घ्यायची हे माहिती नसणं अशी आरोग्याशी निगडित कारणं त्यामागे आहेत. दसरा नावाच्या एका एनजीओच्या रिपोर्टनुसार २३ दशलक्ष मुली या मासिक पाळीच्या काळात शाळा सोडतात. कारण, मुलींना शाळेत मासिक पाळीच्या दरम्यान आवश्यक असणाऱ्या मूलभूत सुविधा मिळत नाहीत. अनहायजिनिक, असुरक्षित साधनांच्या वापरामुळे मुली व महिला मासिक पाळीच्या काळात संक्रमणग्रस्त होतात. मासिक पाळीच्या काळातील स्वच्छता, योग्य पद्धतीने कापड, पॅड किंवा मेन्स्ट्रुएशन कप याचा वापर आणि या गोष्टी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. असुरक्षित, अस्वच्छ साधनांच्या वापरामुळे अनेक मुली, आणि स्त्रिया या विविध आजारांच्या बळी पडतात. युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन, वजायनल कॅन्सर अशा अनेक आजार महिलांना जडतात. या एनजीओनं दर्शवलेले हे आकडे गंभीर आहेत. महिलांच्या मृत्यूचा आठ लाख हा आकडा नक्कीच चिंता करायला लावणारा आहे. कारण हा आकडा आज एकविसाव्या शतकातही महिलांच्या आरोग्याबाबत किती निष्काळजीपणा आहे हे दर्शवतो.

आवर्जून वाचावे असे }

## प्लास्टिक रेझर

***दैनंदिन वापरातले जवळपास २०० कोटी प्लास्टिक रेझर दरवर्षी फेकले जातात. याच्या ऐवजी धातूच्या रेझरचा उपयोग करा. हे धातूचे रेझर स्वच्छ करुन वारंवार वापरता येतात.*** »

कवडसा } { आश्लेषा महाजन, पुणे

आडनाव हेच पुरुषप्रधान संस्कृतीचे द्योतक आहे. आडनावे, कुळे ही आदिपुरुषाच्या नावाने सुरु झाली आहेत. ती एक सामाजिक सोय आहे. स्त्रिया माहेरचे आडनाव अभिमानाने लावत असल्या तरी त्या बापाचे म्हणजे पुरुषकुळाचेच आडनाव लावतात. व्यापक अर्थाने कुठलेही आडनाव पुरुषप्रधानताच जतन करते. शिवाय आडनावांना जात-धर्मही लगडलेला असतो. त्यामुळे आडनावविरहित समाज निर्माण झाला तर समतेचा प्रतीकात्मक का होईना स्वीकार केला, असे म्हणता येईल.

# आडनावविरहित होण्याच्या दिशेनं...





पूर्वी बाळांची पाळण्यातच लग्ने होत. बालविवाह, पौगंडावस्थेतले विवाह होत. आजही काही ठिकाणी ते घडवले जातात. लग्नासाठी मुलीचे वय १८ असावे, हा कायदा एकाच वेळी 'भारत' आणि 'इंडिया' दोन्हीमध्ये कधी डावलला जातो, कधी पाळला जातो.

काळ बदललाय, बदलतोय. लग्नाचे वय बरेच पुढे ढकलले आहे. शिक्षण आणि आर्थिक स्वातंत्र्य यांमुळे स्त्रियांना आत्मभान आलेले आहे. विवाहित स्त्रियांमध्ये माहेरचेचे आडनाव न बदलता तसेच ठेवण्याची किंवा माहेर-सासरच्या आडनावांची जोडी वापरायची पद्धत हल्ली सर्वत्र दिसते. आपले लग्नापूर्वीचे अस्तित्त्व, आडेंटिटी, माहेरच्या घराचा अभिमान असे बरेच मुद्दे त्यात असतात. समजा एखाद्या स्त्रीचे ३५ व्या वर्षी लग्न झाले तर तिला समाजात, नोकरीच्या/व्यवसायाच्या ठिकाणी एक अस्तित्त्व प्राप्त झालेले असते. ती तिच्या नावाने सर्वश्रुत असते. लग्नानंतर तिचे नाव, आडनाव बदलणे व्यावहारिक दृष्ट्याही नुकसानकारक असते आणि तिच्या स्त्री म्हणून अस्मितेच्या दृष्टीनेही. आपले आईवडिलांनी ठेवलेले नाव बदलण्याचा कुणालाही अधिकार नाही, अशी ठाम भूमिका घेतली जाते. त्यापुढे नवरेशाही झुकलेलीही दिसते. याशिवाय स्त्रीचे मूळ (माहेरचे) आडनाव न बदलणे किंवा सासर-माहेर-आडनाव-जोडी करणे असे नवे पर्याय दिसतात. पुरुषप्रधान संस्कृतीने कधी नाईलाजाने, कधी उदारतेने ते स्वीकारले आहे. खूपदा त्याची कुचेष्टाही केलेली आहे. सासर-माहेरचं आडनाव एकच असेल तर 'सुंठेवाचून खोकला गेला', अशी उभयतांची भावना होत असावी. माझ्या काही मैत्रिणींना त्यांनी अभिमानाने घेतलेली जोड-आडनावे डोकेदुखी ठरतात. लग्नाचे सर्टिफिकेट, बॅंक, शेअर्स, चेक्स, अपत्याचा जन्मदाखला वगैरे ठिकाणी ही जोड-आडनावे आडवी आलेली आहेत. प्रत्येक वेळी 'ती मीच आहे' हे पुराव्यानिशी सादर करताना त्या मेटाकुटीला येतात. काही मैत्रिणींनी आपले जोड-आडनाव कायदेशीर/नियमित करून घेतले आहे. याचा अर्थ कायदा लग्नानंतर बाईचे आडनाव बदलते, हे गृहीतच धरतो. जोड-आडनावे लावणे हे स्त्रीच्या विवाहपूर्व अस्मितेचे, अस्तित्त्वाचे प्रतिक आहे, हे मान्यच. पण मुळात आडनाव हेच पुरुषप्रधान संस्कृतीचे द्योतक आहे. आडनावे, कुळे ही आदिपुरुषाच्या नावाने सुरू झाली आहेत. ती एक सामाजिक सोय आहे. स्त्रिया माहेरचे आडनाव अभिमानाने लावत असल्या तरी त्या बापाचे म्हणजे पुरुषकुळाचेच आडनाव लावतात. व्यापक अर्थाने कुठलेही आडनाव पुरुषप्रधानताच जतन करते. शिवाय आडनावांना जात-धर्मही लगडलेला असतो, हा स्वतंत्र विषय. त्यामुळे आडनावविरहित समाज निर्माण झाला तर समतेचा प्रतीकात्मक का होईना स्वीकार केला, असे म्हणता येईल.

नातं तुझं नी माझं } { पल्लवी सुवर्णकार, औरंगाबाद

# बहुपेडी नात्याचा प्रवास

आंतरजातीय विवाह ही मोठीच जोखीम असते. विशेषतः मुलीसाठी. कारण मुलीने लग्न करताना माहेरच्यांचा विरोध डावललेला असतो. शिवाय सासरची मंडळी कश्या पद्धतीनं स्वीकारतील, घरात वागणूक कशी मिळेल याची शाश्वती नसते. मात्र, अशा वेळी घरातल्या मुख्य स्त्री ने अर्थातच सासूने हा विवाह स्वीकारला, सुनेला मुलगी म्हणून वागणूक दिली तर हे नातं बहरतं, फुलतं. अशाच 'आई' झालेल्या सासूबद्दल सुनेनं व्यक्त केलेलं मनोगत...



नातं या एका शब्दात व्यक्तीच्या जन्मापासून ते मरेपर्यंतच्या प्रवासाचं गुपित दडलंय. अर्थात या नात्यात सूर गवसला तर आयुष्याचा प्रवास सुफळ संपूर्ण होतो हे वेगळं सांगायला नको. पण काही नाती विनाकारण वर्षानुवर्षे कायम चेष्टेचा विषय होऊन गेलेली असतात. सासू-सुनेचं नातं हे त्यापैकीच एक नातं. स्वाभाविकपणे लग्नानंतर सासू हा विषय नक्की कसा असेल माझ्याबाबतीत याची काळजी मलाही होतीच. अ‍ॅरेंज की लव्ह मॅरेज हे एका ठराविक काळापर्यंत स्वतःबद्दल कुणीच सांगू शकत नाही. माझ्याही बाबतीत तेच होतं. पण निलेश आयुष्यात आला आणि चित्र स्पष्ट झालं. आमच्या लग्नाला माझ्या माहेरच्यांचा आधी विरोध होता. त्यामुळे नीलेशसोबत आयुष्य हवं असेल तर बंडखोरी करून आंतरजातीय विवाह करणं भाग होतं. धाडस करून मी माहेर सोडलं. मंदिरात अगदी साध्या पद्धतीनं, मोजक्या लोकांच्या साक्षीनं लग्न केलं.

इथपर्यंत सगळं फिल्मी स्टाइल छान वाटलं. पण खरी गंमत नंतरच होती. मी घरात धाकटी. आई-वहिनीमुळे आणि शिक्षणाच्या कारणामुळे कधी स्वयंपाकघरात गेले नव्हते. आता आपलं कसं होणार या भीतीनं मला धडकी भरली. पण माझ्या आईशी म्हणजेच सासूबाईशी माझं नातं ज्या पद्धतीनं सुरू झालं आणि बहरलं तो एक अविस्मरणीय प्रवासच म्हणावा लागेल. त्या प्रवासात आई खंबीरपणे पाठीशी उभ्या राहिल्या म्हणूनच आज माहेरची माणसंही मला परत मिळाली आहेत. आंतरजातीय विवाहामुळे भीती होती मनात, पण आईंचा स्वभाव, समंजसपणा, धीर ठेवण्याच्या वृत्तीमुळे सगळं सोप होतं गेलं माझ्यासाठी. माझ्या या माउलीने मला अगदी स्वयंपाक करण्यापासून ते नाती कशी समजून घ्यावीत हे सांगितलं. शिकवलं. माझ्या सासूबाई म्हणजे एक प्रयोगशाळाच होती माझ्यासाठी. सासूबाई म्हणत, कधी कधी मोठ्यांनी छोटेपणा व छोट्यांनी मोठेपणा दाखवला तर सगळं ठीक होतं. माझ्या लग्नप्रवासात त्यांनी माझी माझ्या नवऱ्याशी ओळख करून दिली. नवऱ्याशी ओळख अशामुळे म्हणतेय की प्रेमविवाहाआधी प्रत्येक मुलीला मुलगा माहिती असतो ते प्रियकर म्हणून. पण तो नवरा म्हणून कसा असेल हे संसाराला लागल्याशिवाय कळत नाही. आणि नेमकं हेच मला सासूबाईंनी शिकवलं. समजावलं. नवरा म्हणून त्याचा जन्म व विकास होताना पत्नी म्हणून मला काय करावं लागेल, काय टाळावं लागेल याची शिकवण त्यांनी मला दिली. आमचं नातं अधिक चांगलं कसं होईल यासाठी त्यांचा प्रयत्न असायचा. माझी दोन्ही बाळंतपणं त्यांनीच पार पाडली. माझ्या मातृत्वासोबत त्याही नव्याने मातृत्व अनुभवत होत्या. त्या काळात त्यांच्या गोंडस नातवाला बघून त्यांना झालेला आनंद मी कधीचं विसरू शकत नाही. आमच्यातलं नातं बहुपेडी होतं. त्या स्वतः मुख्याध्यापक असताना घरातला त्यांचा वावर हा पत्नी, आई, आजी,मैत्रीण असाच होता. खुपच सकारात्मकता होती. लग्नामुळे माझं शिक्षण अर्धवट राहिलं होतं. लग्नानंतर १० वर्षांचा खंड होऊनही मी जेव्हा अर्धवट शिक्षणाचा प्रवासात होते तेव्हा तर त्याही माझ्याबरोबरीने माझं स्वप्न जगत होत्या. माझ्या प्रत्येक यशाचा त्यांना अभिमान होता. कुठलंही नातं टिकवायचं असेल तर त्यासाठी दोन्ही बाजूंनी प्रयत्न हवेत. आपल्या मनासारखं सासरी घडावं अशी अपेक्षा करताना आपण स्वतः सासरच्या मंडळींसाठी किती तडजोडी करतो आहोत याचं आजकालच्या सुनांनी आत्मपरीक्षण करायला हवं असं मला वाटतं. आज सासूबाई आमच्यात नाहीत. मात्र प्रत्येक प्रसंगात पाठीशी खंबीर उभं राहणारी सासू प्रत्येक जन्मी मिळावी यासाठी एखाद्या व्रताची व्यवस्था असायला हवी होती आपल्या संस्कृतीत...

### वाचकांना आवाहन

- लग्नानंतर सासरी अ‍ॅडजस्ट व्हायला तुम्हाला सासूनं कशी मदत केली?
- सासूसोबतच नातं कसं डेव्हलप होत गेलं?
- तुमच्यातले मतभेदाचे प्रसंग तुम्ही दोघींनी कसे हाताळले?
- आधुनिक सुनांच्या भुमिकेबद्दल तुम्हाला काय वाटतं?
- आजघडीला तुमच्या आयुष्यात सासूचं काय स्थान आहे?
- मोजक्या शब्दात फोटोसह आम्हाला लिहून कळवा. पत्ता शेवटच्या पानावर.

समाजभान } { सागर बेंद्रे, शहापूर (मध्य प्रदेश)

एफबी, व्हॉट्सअ‍ॅप, ट्विटरसारख्या माध्यमांवर बोटं फिरवत टाइमपास करणारी पिढी मागे पडतेय. समाजातले प्रश्न समजून-उमजून ते सोडवण्यासाठी त्यांची धडपड सुरुय.अशाच काही युवकांच्या 'सोशल धडपडीच्या' या कहाण्या...

# अनिश्चितताच आधी निश्चित केली...



मी पुण्याजवळच्या अरणगावचा. शाळेसाठीच्या ११ किमीच्या पायपिटीतच शेती, गावाकडचे प्रश्न उमगत गेले. पुण्यात अभियांत्रिकीला मी प्रवेश घेतला. पुण्यात आल्यावर वाचनाची आवड निर्माण झाली. कॉलेजमध्ये सामाजिक उपक्रमात सहभागी व्हायला लागलो. नवनवीन प्रश्न समजू लागले. कधी कधी स्पर्धामय जगण्याचा कंटाळा यायचा, त्रास व्हायचा. समाजातल्या चुकीच्या गोष्टींबद्दल संतापही यायचा. प्रशासकीय सेवा आणि चळवळीतला कार्यकर्ता हे समाजकार्याचे दोनच मार्ग तोवर माहित होते. दोन्ही माझ्या पचनी पडणारे नव्हते. 'आपल्या शिक्षणाचा समाजासाठी काय उपयोग?' या प्रशाच्या उत्तरात मी 'निर्माण' जवळ थांबलो.

'निर्माण'मुळे माझ्या क्षमता, कल, त्यानुषंगाने माझ्या ध्येयाबद्दल स्पष्टता आली. शिक्षणाचा उपयोग समाजातले प्रश्न सोडवण्यासाठी करण्याचा निर्णय पक्का झाला. सामाजिक प्रश्नातली माझ्या भूमिकेवर अभ्यास सुरु झाला. छोट्या छोट्या कृतीपेक्षा एका विषयात खोल जाणे अधिक अर्थपूर्ण वाटलं. फक्त उपक्रम करायच्या मानसिकतेतून (activity based mode) मी प्रश्न मुळापासून सोडवण्याच्या मानसिकतेकडे (problem solving mode) गेलो. 'डेव्हलपमेंट' नावच्या नवीन क्षेत्राची ओळख झाली. निर्माणचं पहिलं शिबीर पूर्ण केल्यावर विविध फेलोशिपची माहिती घेतली.निर्माणच्या एका सत्रादरम्यान डॉ. योगेश काळकोंडे म्हणाले होते, "Uncertainty is a hard reality of life & Uncertainty is the only certain thing in the world." अनिश्चितता हे वास्तव आहे आणि तीच जगातली एकमेव निश्चित गोष्ट आहे. या वाक्याने जरा हादरलोच. यश, अपयश हे परिस्थिती किंवा प्रयत्नावर अवलंबून असतं. प्रयत्न करण्याची भावना जास्त सक्षम करणारी वाटू लागली. या सर्वांचा निर्णयापर्यंत पोहचतानाची भीती कमी होण्यास, निर्णय प्रत्यक्षात आणण्यास मदत झाली. SBI Youth for India Fellowship द्वारे BAIF Development Research Foundation या सामाजिक संस्थेबरोबर मध्यप्रदेशातल्या बैतुल जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात काम करण्याची संधी मिळाली. बैतुल हा आदिवासी बहुल भाग. गोंड आणि कोरकू आदिवासी समुदायाची वस्ती. येथील मुख्य व्यवसाय पावसावर आधारित शेती. शेतीतून मिळणारे तोकडे उत्पन्न, रोजगाराच्या अपुऱ्या संधी, त्यामुळे होणारे स्थलांतर, आरोग्य अशा समस्या या भागात तीव्र स्वरूपाच्या होत्या. पाण्याची टंचाई. शेती रखरखीत झालेली. जमिनीत मुबलक पाणी. पण त्या पाण्याचा उपसा करण्यासाठी वीजपुरवठा नाही. जो होता त्यासाठी डिझेल इंजिन वापरावं लागे. पण त्याचा खर्च परवडत नव्हता. दळण दळण्यासाठी १७ किमी दूर डोंगरांच्या रस्त्याने जावं लागतं. पीकविमा आजपर्यंत कधीच मिळाला नाही. शेतीसाठी पाणी उपसण्याचा खर्च कमी करण्याच्या हेतूने मी सोलर पंपचा विचार केला. पण तंत्रज्ञान महागडे होते. एका शेतकऱ्याला परवडणार नाही पण समुहाला परवडू शकेल या उद्देशाने सहज वेगवेगळ्या शेतात नेण्याजोगी सोलर पंप यंत्रणा तयार केली. शेतकऱ्यांच्या गटामध्ये वापरासाठी दिली. या यंत्रणा बनवण्याच्या कामात लोकांचा सहभाग वाढवला. पाच गावामधील गटामध्ये दिलेली ही यंत्रणा पाणी उपसण्यासाठी लागणारा खर्च कमी करणारी ठरली. सोबतच डिझेल इंजिन मधून होणारा कार्बन उत्सर्गही थांबला. पथदिवे आणि घरातील दिवे यासाठी सौर उर्जेच्या साधनाबद्दलची जनजागृतीही घडवून आणली. या भागात स्वयंपाकासाठी लाकडाचा वापर केला जायचा. त्यामुळे महिलांच्या आरोग्याचा, पर्यावरणाचा प्रश्न होता. यावर उपाय म्हणून 'बायफ'ने तयार केलेल्या बायोगॅस (IRESA - Integrated Renewable Energy & Sustainable Agriculture) मॉडेलची अंमलबजावणी सुरु केली. आज अनेक घरी पूर्ण स्वयंपाक बायोगॅसवर होतो.

हा वर्षभराचा प्रवास माझ्यासाठी पूर्णपणे नवीन होता. विषयाची व्यापकता समजली. विविध तांत्रिक उपाययोजनांवर काम करण्याची एक जिवंत प्रयोगशाळाच माझ्यासाठी खुली झाली. अल्बर्ट आईन्स्टाईन म्हणतो, "It has become appallingly obvious that Technology has exceeded our humanity", हे आता स्पष्ट झालं आहे की तंत्रज्ञान आज माणुसकी ओलांडून पुढे जात आहे. आज मोठमोठ्या कारमध्येही सुधारणेची गरज आहे आणि शेतकऱ्याकडे असलेल्या बैलगाडीतही. पण यातील बैलगाडीतील सुधारणा मला जास्त गरजेची आणि अर्थपूर्ण वाटते. पुढचं ध्येय ठरलं आहे. पर्यावरणातील बदलाच्या अनुषंगाने पर्यायी ऊर्जासंसाधनांचा शेती आणि जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने उपाययोजना करून ती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवायची आहे. शेवटी काय, अनिश्चितता हेच वास्तव. वास्तवालाच मला भिडायचंय.

चर्चेतला विषय}

# फक्त 'आवाजी' मंजुरीच...

**तिहेरी** तलाकचा विषय सध्या पुन्हा एकदा चर्चेत आलाय. निमित्त आहे गेल्याच आठवड्यात लोकसभेतल्या प्रदीर्घ चर्चेनंतर तिहेरी तलाक विधेयकाला तिसऱ्यांदा मिळालेली 'आवाजी' मंजुरी. विधेयकाला राज्यसभेच्या मंजुरीनंतर राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीसाठी पाठवले जाईल. स्वाक्षरीनंतरच तिहेरी तलाक प्रथा कायदेशीररीत्या बंद होऊ शकेल. एखाद्या पुरुषाला तिहेरी तलाकनंतर तीन वर्षांची शिक्षा दिली तर तो कुटुंबाला भत्ता कसा देऊ शकेल, हिंदू आणि ख्रिस्ती धर्मातील पुरुषांना एक वर्षांची शिक्षेची तरतूद तर मुस्लिम धर्मातील तरुणांना तीन वर्षांच्या शिक्षेची का असे प्रश्न विरोध करणाऱ्यांनी उपस्थित केलेत. तिहेरी तलाक विधेयक लोकसभेत याआधीही दोनदा मांडण्यात आलं होतं. सामाजिक सुधारणा यापेक्षाही या मुद्द्याकडे कट्टर धार्मिकतेच्या, राजकीय लाभ मिळवण्याच्या चष्म्यातून पाहिलं जात असल्यानं जेव्हा जेव्हा हे विधेयक लोकसभेत मांडलं गेलं तेव्हा तेव्हा त्यावर केवळ चर्चाच घडल्या. विरोधच झाला. ८ एप्रिल १९६६ ला अवघ्या सात मुस्लिम महिलांसह द्रष्टे सुधारक हमीद दलवाईंनी या तिहेरी तलाक विरोधातल्या बंडाची ठिणगी टाकली होती. (ज्यात हमीदजींच्या पत्नी, बहीण,वहिनीही सहभागी होत्या ) मोर्चात सहभागी महिलांची संख्या अत्यल्प होती, तरी त्यामागे विचार व्यापक होता. मात्र ५३ वर्षांपुर्वी दूरदुष्टीच्या या नेत्यानं लावलेल्या महत्वाच्या सुधारणेच्या रोपट्याचं, राजकीय, वैयक्तिक, धार्मिक स्वार्थापोटी दुर्दैवानं वटवृक्षात रुपांतर होऊ शकलेलं नाही.

आवर्जून वाचावे असे }

## प्लास्टिक बॉटल

***दैनंदिन वापरातल्या प्रत्येक मिनीटाला १० लाख प्लास्टिक बाटल्या खरेदी केल्या जातात. २०२१ पर्यंत ही संख्या २० टक्क्यांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे गरज नसेल तिथे प्लास्टिक बाटल्या वापरणे टाळाच.*** »

टेक अपडेट } {कविता दातार, जळगाव

# मदतीचा हात देणारे अ‍ॅप

आर्थिक स्तर कुठलाही असला तरी सर्वच महिला मोबाइल वापरतात. शिक्षण, नोकरी, इतर गोष्टींनिमित्त अनेकींना वेळी-अवेळी घराबाहेर पडावे लागते. अशा वेळी त्यांच्या सुरक्षेसाठी काही अ‍ॅप तयार करण्यात आले आहे. आजच्या टेक अपडेटमध्ये त्याबद्दल जाणून घेऊयात.

bsafe you

महिलांबाबतच्या वाढत्या गुन्हेगारीमुळे लोकांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. स्त्रियांना आत्मविश्वासाने वावरता यावे यासाठी महिला सुरक्षा अ‍ॅप्स उपलब्ध आहेत.जी महिलांसाठी सुरक्षा संरक्षक म्हणून कार्य करतात. Google Playstore आणि IOS App Store वर उपलब्ध असणारे अ‍ॅप, त्यांचं तंत्रज्ञान कसं काम करतं ते जाणून घेऊ.

**Eyewatch SOS** - वापरकर्त्याच्या आसपासचे ऑडिओ आणि व्हिडिओ कॅप्चर करते. इशाऱ्याच्या संदेशासह नोंदणीकृत संपर्काकडे पाठवते.स्थान अचूकतेसाठी यात जीपीआरएस वापरलेले आहे. सुरक्षित स्थानापर्यंत पोहोचल्यानंतर सुरक्षित असल्याचे बटण दाबून जवळच्या लोकांना सूचित करता येते.

**SpotNSave Feel Secure** - दर दोन मिनिटाला प्री-रेकॉर्डेड नंबरवर, स्थानासह अलर्ट संदेश पाठवते. फोन बंद असल्यास वापरकर्ती wristband वापरु शकते, जो अ‍ॅपसह येतो. बँडवर प्रेस बटण दिलेले असते.

**iGoSafely** - आणीबाणीच्या परिस्थितींत रेकॉर्डेड नंबरवर सतर्कता संदेश, जीपीएस स्थान पाठवण्याची सोय आहे. अलार्म चालू असल्यास प्रत्येक मिनिट संदेश पाठवला जाईल. हे फोन झटकून किंवा हेडफोन काढून टाकून सक्रिय केले जाऊ शकते.

**Smart 24 × 7** - वापरकर्त्यांने बटण दाबल्यास पोलिसांना कॉल जातो. इतर नंबरवर कॉल करण्याचा पर्यायही अ‍ॅपवर उपलब्ध आहे. जीपीआरएसची कार्यवाही न झाल्यास, स्थान एसएमएसद्वारे पाठवले जाते. ट्रॅकिंग, चॅटिंग सारख्या वैशिष्ट्यांसह, हे अ‍ॅप फोटो देखील क्लिक करते तसेच ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्ड करते.

**BSafe** - अलार्मसह अचूक स्थान आणि ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डेड नंबरवर पाठवते. यातील 'फॉलो मी' फीचर जीपीएस ट्रॅकिंगद्वारे वापरकर्त्याचे वर्च्युअल ट्रॅकिंग करते. 'फेक कॉल' हे फीचर काही अप्रिय परिस्थितीतून सुटण्यासाठी नकली कॉल करण्याची अनुमती देते. 'टाइमर अलार्म' आपल्या अभिभावकांना आपल्याबद्दल माहिती देण्यासाठी स्वयंचलित अ‍ॅलार्म सेट करते. या व्यतिरिक्त **Trakie, My SafetyPin, Shake2Safety, CitizenCop** हे सुरक्षा अ‍ॅप्स उपलब्ध आहेत.

(**लेखिका सायबर सेक्युरीटी सल्लागार आहेत**)